अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

शनिवार, दि.१४ जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १०९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८



सविस्तर पान ८ वर

## श्री शिवयोगी सिध्दारामेश्वर महाराज की जय....

सिध्देश्वर मंदिर परिसरात मानाचे सातही नंदीध्वज आल्यानंतर सिध्देश्वरांच्या जयघोषाने परिसर दुमदमुला...

## गळितानंतर चिमणीवर कारवाई होणार
## बोरामणी विमानतळासाठी प्रयत्न करणार
## पालकमंत्र्यांनी आश्वासनांचे विमान उडवले



✔ सुराज्य/सोलापूर



**सोलापूरच्या विकासासाठी विमानसेवा मूलभूत गरज आहे. मात्र होटगी रोड विमानतळावरुन विमानसेवा चालु करण्यासाठी श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या चिमणीची अडचण आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार सर्व प्रशासकीय यंत्रणांची कायदेशीर अडचण दूर झाली आहे. कारवाईची प्रक्रिया सर्व यंत्रणांनी पूर्ण केली आहे. कारखान्याला कारवाईची अंतिम नोटीस देखील दिली आहे. मात्र सध्या कारखान्याचा गळीत हंगाम चालू आहे. गळीत हंगामामध्ये शेतकऱ्यांच्या नुकसान नको म्हणून हंगाम संपण्याची आणि कारखाना बंद होण्याची आम्ही वाट पाहत आहोत. कारखाना बंद झाल्यानंतर कारखान्याच्या चिमणीसंदर्भात कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिले.**

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीच्या निमित्ताने दोन दिवस सोलापूर दौऱ्यावर आहेत. नियोजन भवनातील बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी सोलापूरच्या विमानतळाविषयी भाष्य केले. सोलापूर शहरांमध्ये पायाभूत सुविधा आहेत. मात्र विमानसेवेअभावी गुंतवणूकदार शहरांमध्ये गुंतवणूक करण्यास तयार नाहीत. आता शहरासंदर्भातील सर्व क्षेत्राचा विकास आराखडा तयार करून राज्य शासनाला सादर केला जाणार आहे. पर्यटन आणि रोजगाराला प्राधान्य दिले जाणार आहे. यासाठी जिल्हा नियोजन समितीतून या आराखड्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. मात्र सोलापूरच्या विकासासाठी विमानतळ ही मूलभूत गरज आहे.

### ■ प्राधिकरणाकडील सुनावणीसाठी बैठक

श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या चिमणीचा अडसर दूर करण्यासाठी महापालिका प्रशासन, प्रदूषण महामंडळ, पाणी पुरवठा, राज्य शासन आणि इतर यंत्रणांनी कारवाईची सर्व प्रक्रिया न्यायालयाच्या निर्देशानुसार पुर्ण केली आहे. विमान प्राधिकरणाकडे यासंदर्भात एक सुनावणी प्रलंबित आहे. ही सुनावणी तात्काळ घेण्यासाठी आपण नागरी हवाई वाहतूक मंत्री यांच्याकडे पाठपुरावा करणार आहोत. बैठकीची मागणी देखील केली आहे. हा विषय निकाली काढला जाईल, असा शब्दही पालकमंत्र्यांनी यावेळी दिला.

### ■ शेतकऱ्यांचे नुकसान नको

सध्या कारखान्याचा सगळीत हंगाम चालू आहे. गळीत हंगामामध्ये कारवाई केल्यास शेतकऱ्यांचे नुकसान होईल. गळीत हंगाम संपल्यावर कारखान्याच्या चिमणीसंदर्भात कारवाई केली जाईल. कोणत्या एका व्यक्तीसाठी शहराचा विकास रखडणे हे भूषण नाही, विमानसेवा चालू होणे ही काळाची गरज आहे, अशी भूमिका पालकमंत्र्यांनी यावेळी मांडली.

### ■ बोरामणी विमानतळासाठी पाठपुरावा

माळढोक अस्तित्वात आहे की नाही, हे कुणालाच माहित नाही. वन विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांना देखिल हा माळढोक दिसला नाही, असे वनविभागाचे अधिकारी सांगतात. असे असताना त्यासाठी विमानतळाचा विकास अडवून ठेवणे योग्य होणार नाही. वनविभागाची जागा मिळवून देण्यासाठी आपण बैठक घेऊन मार्ग काढू आणि बोरामणी विमानतळाचा प्रश्न मार्गी लावू असा विश्वास पालकमंत्री विखे-पाटील यांनी दिला.

## वाळू चोरीतील आरोपी पळाले, तीन पोती वाळू, २० गाढवे मिळाले

▶ पंढरपूर पोलिसांनी केली कारवाई

✔ सुराज्य/पंढरपूर

चोरीची वाळू वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणारे २० गाढवे शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणातील दोन आरोपींना मात्र पळून जाण्यात यश आले.

पंढरपूर शहर व तालुक्यात वाळू चोरी मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे पोलीस व महसूल खात्याच्या वतीने कारवाया करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून शहर पोलिसांचे पथक बुधवारी मध्यरात्री गस्त घालत असताना जय भवानी चौक येथे गाढवांच्या पाठीवर ठिके आढळून आले. पोलिसांना पाहताच दोन जणांनी धूम ठोकली. सदर वीस गाढवांच्या पाठीवर ठिक्यामध्ये वाळू आढळून आली. या प्रकरणी दोन लाख रुपये किमतीची २० गाढवे तसेच पाऊण ब्रास वाळू असा दोन लाख दोन हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मात्र सदर वाळू चोरी करणारे दोन आरोपी मात्र पकडण्यात पोलिसांना यश आले नाही. मागील आठवड्यात देखील शहर पोलिसांनी वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी १४ गाढवे ताब्यात घेतली होती. सदर कारवाई शहर पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई. वाघमोडे, हेड कॉन्स्टेबल कदम, हेंबाडे, आतार व पवार यांनी पार पाडली.



### दुचाकी आणि तीन पोती वाळू केली जप्त

पंढरपूर पंढरपुरातून दुचाकीवरून वाळू उपसा करण्याचा नवा फंडा सुरू झाला आहे. यामध्ये एखादा अटक करण्यात आली आहे. आरोपीकडून एक दुचाकी आणि तीन वाळूची पोती पोलिसांनी जप्त केली आहेत. पंढरपूर शहर आणि तालुक्यातून सुरू असलेल्या वाळू उपसा काही केल्या बंद होत नाही. पोलीस आणि महसूल विभागाने वाळू रोखण्यासाठी विशेष पथक निर्माण केली आहेत. मात्र वाळूमाफिया वेगवेगळ्या पद्धतीने वाळू उपसा करत आहेत. पंढरपूर शहरातून वाळू उपसा करण्याचे प्रमाण कमी करण्यात पोलीस प्रशासनाला यश आले आहे. मात्र सध्या दुचाकीवरून वाळू उपसा पंढरपुरात होताना दिसत आहे. दुचाकी वर दोन-तीन पोत्याच्या ठीक्यामध्ये वाळू भरून वाहिली जात आहे. याप्रकरणी अटक करण्यात आली आहे त्याच्याकडून तीन वाळूची ठिकी दुचाकी पोलिसांनी जप्त केली आहे. पुढील तपास पोलीस नाईक सुनील बनसोडे करत आहेत.

### हॉकी विश्वचषक
## भारताची विजयी सलामी, स्पेनचा पराभव

✔ **ओडीशा :** हॉकी विश्वचषकात भारताने स्पेनवर मात करत विजयाची सलामी दिली आहे. भारताने स्पेन संघाविरुद्ध २-० अशी विजयी आघाडी मिळवली आहे. यावेळी भारताने विजय मिळवल्यानंतर भारतीय संघांचं कौतुक केलं जात आहे. सामन्याच्या सुरुवातीपासूनच भारतीय खेळाडूंनी उत्तम कामगिरी करण्यास सुरूवात केली. त्यानंतर भारतासाठी अमित रोहिदास आणि हार्दिक सिंग यांनी गोल केला. १-० अशी आघाडी घेतल्यावर भारताने आणखी दमदार खेळ सुरु केला. १२व्या मिनिटाला अमितने गोल करताना भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

## ऊस घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरला कंटेनरची धडक; ट्रॅक्टर चालक ठार

▶ डिझेल टाकी फुटल्याने कंटेनरचे टायर जळून खाक

▶ कंटेनरच्या केबिनमध्ये पोचली आग

✔ सुराज्य/सोलापूर

साखर कारखान्याला ऊस घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरला कंटेनरने समोरून जोरात धडक दिली. त्यात ट्रॅक्टर चालक कल्लप्पा भुताळी पुजारी (वय-४२) याचा जागीच मृत्यू झाला. कंटेनर चालक जखमी झाला असून त्याच्यावर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

पुण्याहून विजयपूरकडे जाणारा कंटेनर भरधाव वेगाने जात होता. गुरूवारी रात्री साडेदहाच्या सुमारास ट्रॅक्टर ऊस घेऊन विरुद्ध दिशेने सोलापूरकडे येत होता. कंटेनर चालकाला त्याचा अंदाज आलाच नाही. ट्रॅक्टर व कंटेनरची समोरासमोर जोरात धडक झाली. ही धडक एवढी जोरात होती की, ट्रॅक्टरचे बोनेट पूर्णपणे चेमटले होते. डिझेल टाकी फुटल्याने कंटेनरचे टायर जळून खाक झाले होते आणि कंटेनरच्या केबिनमध्ये आग पोचली होती.जखमी कंटेनर चालक त्यात भाजला असून त्याच्या पोटाला व पाठीला जखम झाली आहे.



## एटीएम कार्डची आदलाबदल; दोघांना अटक

### तीन मोटारसायकलीसह दीड लाखांचा ऐवज जप्त

✔ सुराज्य/सोलापूर

एटीएम कार्ड आदलाबदल करून बँक खातेदारांची फसवणुक करणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक करून चोरीच्या तीन मोटारसायकलीसह १ लाख ६० हजाराचा ऐवज जप्त करण्यात आला. सागर शामकुमार जाधव (रा. सोलापूर), पृथ्वीराज मोहन अडसुळे (रा. धाराशिव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

हे दोघे मित्र असून यातील सागर जाधव हा गणपती मूर्ती तयार करण्याचे काम करतो आणि पृथ्वीराज अडसुळे हा धाराशिव येथे एका एटीएम सेंटर वर सुरक्षा रक्षक म्हणून कामाला होता. त्यावेळी त्याला काही लोकांचे




ब्लॉक झालेले कार्ड मिळालेले होते त्यावरून त्याने सोलापूरला येऊन मित्र सागर याला सोबत घेत एटीएम सेंटरवर पैसे काढण्यासाठी आलेल्या ज्येष्ठ नागरिकांवर नजर ठेवत होते. त्यांच्या मागे उभे राहून पिन कोड पाहून त्यांना फसवून एटीएम कार्डची आदलाबदल करून परस्पर पैसे काढून घेत होते. पार्क चौकात लावलेल्या दोन मोटारसायकली आणि उस्मानाबाद मधील आनंद नगर येथील एक मोटारसायकल अशा तीन मोटारसायकली त्यांनी चोरी केल्या होत्या. शहर गुन्हे शाखेच्या पोलीसांनी त्यांना अटक करून त्यांच्याकडून तीन मोटारसायकली तसेच काही एटीएम कार्ड जप्त केले. ही कामगिरी शहर गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील, पोलीस अंमलदार श्रीकांत पवार, विजय वाळके, राहुल तोगे, विद्यासागर मोहिते, गणेश शिंदे,सतीश काटे यांनी पार पाडली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



छे..छे..! ते अंतराळवीर नाहीत; त्यांच्याकडे आज पाणी आलयं..!

| कल्याण |
|---|
| -------- |

| मेन बाजार |
|---|
| -------- |

## सोलापूरची बलस्थाने ओळखून विकास आराखडा

▶ पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची ग्वाही

✔ सुराज्य/सोलापूर

शहर व जिल्ह्याची बलस्थाने ओळखून रोजगार व धार्मिक पर्यटनावर भर देत सोलापूरच्या विकासासाठी स्वतंत्र आराखडा तयार करण्यात येईल. यासाठी गरज भासली तर जिल्हा नियोजन समितीमधून निधीही उपलब्ध करून दिला जाईल. सोलापूर जिल्ह्याची ब्रँड व्हॅल्यू निर्माण करण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत केली जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

शुक्रवारी, नियोजन भवनात पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत अध्यक्षस्थानावरून पालकमंत्री विखे-पाटील बोलत होते. पंढरपूर, शेजारील तुळजापूर आणि गाणगापूरवर लक्ष केंद्रित करून धार्मिक पर्यटन वाढून त्याद्वारे रोजगार निर्मिती कशी होईल? याचा अभ्यास करून सर्व प्रशासकीय यंत्रणांनी सर्वंकष विकास आराखडा तयार करावा, असे सांगून पालकमंत्री पुढे म्हणाले की यासाठी सल्लागार समिती स्थापन करण्यात यावी. सल्लागार समितीने लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने विकासात्मक भूमिका घेऊन काम करावे. आराखडा तयार करीत असताना जुन्या जाणत्या लोकांना व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्या. महिला बचत गटांच्या उत्पादनांचे ब्रँडिंग व मार्केटिंग होण्याच्या दृष्टीने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. जिल्ह्यात आयटी पार्क होण्याच्या दृष्टीने पावले उचलू. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून, प्राचार्य, उद्योजक व अन्य क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून असणाऱ्या अपेक्षा मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे. जिल्ह्यात रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील, अशा पद्धतीने नियोजन करण्याच्या सूचना केल्या.



### ■ जी-२० देशातील शिष्टमंडळ उद्या पुण्यात

जी-२० देशातील शिष्टमंडळ उद्या पुण्यात येत आहे. या शिष्टमंडळास सोलापुरी चादर व टॉवेल भेट देणार असल्याचे सांगून २२ देशांतील सदस्यांपर्यंत या माध्यमातून सोलापूरच्या उत्पादनांचे ब्रँडिंग होईल, असा विश्वासही पालकमंत्र्यांनी व्यक्त केला.

### ■ ६५८.२३ कोटींचा चालू आर्थिक विकास आराखडा

चालू आर्थिक वर्षाकरिता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) साठी ५०२.९५ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजनासाठी १५१ कोटी रुपये, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनासाठी ४.२८ कोटी रुपये असा एकूण ६५८.२३ कोटी रुपयांचा आराखडा प्रस्तावित करण्यात आला आहे. या प्रारूप आराखड्यास राज्यस्तरीय समितीसमोर सादर करण्यास समितीने मान्यता दिली. तसेच अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत सादर करण्याच्या अनुषंगाने १६६ कोटी रुपयांच्या अतिरिक्त मागण्यांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. यामध्ये आणखी निधी वाढवून मिळण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.